जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र ९८१९२०८२७९

प्रेसनोट

दिनांक ०४.०१.२०२५

## ''रेझींग डे निमित्त जेष्ठ नागरिक संवाद मेळावा व आरोग्य तपासणी शिबिर''

शांतीनगर पोलीस स्टेशन हद्दीतील स्वर्गीय संपदा नाईक हॉल, भादवड, भिवंडी या ठिकाणी दिनांक ०४/०१/२०२५ रोजी ११:०० वा. ते ०२.०० वा. दरम्यान रेझींग डे सप्ताह निमित्त भिवंडी शहरातील एकटे रहाणारे जेष्ठ नागरिक यांचा संवाद मेळावा व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास एकटे रहाणारे जेष्ठ नागरिक यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांचे सोबत मा.श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी संवाद साधुन त्यांचे अडीअडचणी तसेच आरोग्याबाबत विचारपुस करून व त्यांना बरोबर मदत करण्यासाठी पोलीस दल सदैव कार्यतत्पर राहील याबाबत त्यांना ग्वाही दिली. यावेळी जास्तीत जास्त जेष्ठ नागरिक यांनी आरोग्य तपासणी करून सदर शिबिरास भरघोस प्रतिसाद दिला.

सदर कार्यक्रमास मा.श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, श्री.विनायक देशमुख, अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे, श्री.मोहन दहीकर, पोलीस उप आयुक्त, परिमंड—२ भिवंडी तसेच भिवंडी मधील पोलीस अधिकारी, अंमलदार व २०० जेष्ठ नागरिक उपस्थित होते. **तसेच मा.श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे यांनी जेष्ठ नागरिकांबाबत संवाद मेळावा व आरोग्य तपासणी शिबिराचा कार्यक्रम भिवंडी शहरात घेतल्या बद्दल सर्व जेष्ठ नागरिकांनी त्यांचे विशेष आभार मानले आहे.**

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर